


दैनिक **अक्षराज**
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३०६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१७ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# दुष्काळ पडणार नाही, या वर्षाचं साल सर्वात चांगलं राहणार : पंजाबराव डख

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** प्रशांत महासागरात सुरु असलेल्या वातावरणातील बदलांमुळे राज्यात अपेक्षित पाऊस पडण्यास विलंब होत आहे. राज्य आणि देशातील मान्सूनवर यंदा अल-निनोचं संकट आहे. या संकटामुळे राज्यावर दुष्काळाचे देखील सावट आहे. राज्यात यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान विभागाच्या शास्त्रज्ञांकडून यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस पडणार असल्याचा अंदाज आहे. यामुळे राज्यातील शेतकरी चिंतेत आहेत. पेरण्या केल्या आणि पाऊस पडला नाही तर शेतीचं मोठं नुकसान होण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकरी चातकासारखी पावसाची वाट पाहत आहे.

एकीकडे राज्य सरकारकडून अल-निनोच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना केल्या जात आहेत तर दुसरीकडे हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी यंदा भरपूर पाऊस पडणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. पंजाबराव डख यांच्यावर ग्रामीण भागातील शेतकरी खूप विश्वास ठेवतो. त्यामुळे त्यांच्या या अंदाजाला महत्त्व मानलं जातं.

**पंजाबराव डख यांचा नेमका अंदाज काय?**

शेतकऱ्यांना सांगू इच्छितो, शेतकऱ्यांनो घाबरु नका. या जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पाऊस येणार आहे आणि शेतकऱ्यांच्या पेरण्या सुरु होणार आहेत. तसेच काही जणांच्या तरीही पेरण्या राहिल्या तरी १० जुलै ते १५ जुलैच्या काळातही तुफान पाऊस येईल. तेव्हाही पेरण्या करता येतील. पण दुष्काळ वगैरे पडणार नाही, असा दावा पंजाबराव डख यांनी केला.

**'यंदाचं साल सर्वात चांगलं राहणार'**



महाराष्ट्रात मान्सून दाखल झाला. पण दाखल झाल्यानंतर तो स्थिरावला. पण वारा सुटण्याची ही परिस्थिती पाऊस पडल्यानंतर पुढच्या महिन्यात असते. यावर्षी ही परिस्थिती आधी आल्यामुळे शेतकऱ्याला असं वाटतंय की, यावर्षी पाऊस पडणार नाही. प्रसारमाध्यमांमधून भेडसावत आहेत की, दुष्काळ पडणार. मी सर्वप्रथम सांगतो, या वर्षाचं साल सर्वात चांगलं राहणार आहे. जूनच्या शेवटच्या आठवड्यात पेरणीयोग्य पाऊस पडणार आहे. सगळ्यांच्या हळूहळू पेरण्या सुरु होणार आहेत, असं पंजाबराव डख यांनी म्हटलं आहे.

**यंदा कोणत्या महिन्यात कसा पाऊस पडणार?**

यावर्षी जून महिन्यात थोडासा पाऊस कमी पडणार आहे. पण जुलैत जास्त पाऊस पडणार आहे. ऑगस्टमध्ये कमी राहील. सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये परत धुमाकूळ घालणार आहे. पण दुष्काळ वगैरे पडणार नाही. यंदाचं वर्ष शेतकऱ्यांचं हिताचं साल आहे. शेतकऱ्यांसाठी खूप चांगलं साल आहे. शेतकऱ्याने घाबरुन जाऊ नये, असं आवाहन पंजाबराव डख यांनी केलं आहे.

**राज्यात कधी कुठे पाऊस पडेल?**

१८ जून नंतर पूर्व विदर्भातून पावसाला सुरुवात होईल. तिथून पाऊस मराठवाड्याच्या दिशेला येईल. २१ ते २९ जून काळात मराठवाड्यात वेगवेगळ्या ठिकाणी पाऊस पडेल. २३ ते २९ जूनच्या दरम्यान पाऊस उत्तर महाराष्ट्रात जाईल. याच काळात पश्चिम महाराष्ट्रातही पाऊस पडेल. पण दुष्काळ वगैरे काही पडणार नाही, अशी माहिती पंजाबराव डख यांनी दिली.

**मुख्यमंत्र्यांच्या अधिकाऱ्यांना पिण्याच्या पाण्याच्या बचतीसाठी महत्त्वाचे आदेश**

दरम्यान, अल निनोमुळे राज्यात कमी पावसाची शक्यता असल्याने मुख्यमंत्र्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना महत्त्वाचे आदेश दिले आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत महाराष्ट्र पेयजल धोरण २०२६ जाहीर झालं आहे. या धोरणाच्या माध्यमातून ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याचे पाणी सुरक्षित करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत.

या योजनेच्या माध्यमातून आता ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर प्रभावी उपाययोजनांवर भर देण्यात येणार आहे. तसेच ग्रामीण पेयजल योजनांचा विकास करण्यात येणार आहे. स्वच्छ, निर्जंतुक आणि दर्जेदार पाणी पुरवठा व्हावा यासाठी नियोजन करण्यात येणार आहे. यासोबतच ही योजना चांगल्या रितीने राबवण्यासाठी दीर्घकालीन नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

# कुणबी प्रमाणपत्रासाठी चुकीचे निकष खपवून घेणार नाही - जरांगे पाटील

## पाटणच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांचे जंगी स्वागत



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१६, पाटण (सातारा) :** मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी कोल्हापूर वरुन बारामतीला जात असताना कराड येथे पाटण तालुका मराठा क्रांती मोर्चा सेवकांची भेट घेतली यावेळी मनोज जरांगे पाटील यांचे पाटणच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी पाटण मधे सर्वात जास्त कुणबी नोंदी सापडल्या आहेत. मात्र प्रमाणपत्र देण्यात चुकीचे निकष लावून जाणुनबुजून अडथळे निर्माण केले जात आहेत ते खपवून घेणार नाही. याबाबतीत माझ्याकडे अनेकदा तक्रारी आल्या आहेत. यासाठी मी लवकरच पाटणला भेट देणार आहे. असे आश्वासन मनोज जरांगे पाटील यांनी पाटण वासियांना दिले.

यावेळी मराठा क्रांती मोर्चा पाटण तालुक्याचे सेवक राजेंद्र निकम, प्रशांत पाटील, शंकरराव मोरे, चंद्रकांत शिर्के, धैर्यशील पाटणकर, जयवंतराव सुर्वे, मनोहर यादव, राहुल शेडगे, विक्रम यादव, प्रदीप घाडगे, अनिल भोसले, नितीन पिसाळ, शंकर मोहिते, लक्ष्मण चव्हाण, शैलेश जगताप, राजेंद्र मोरे, कुमार साळुंखे, सदाशिव पवार, बाबा पवार, प्रविण उदुगडे, संजय कांबळे, कोंडीबा संकपाळ आदी मराठा सेवक उपस्थित होते.

मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील हे सोमवारी कोल्हापूर दौऱ्यावर आले असता कोल्हापूर दौरा आटोपून फलटण बारामतीला जाताना कराड येथे मराठा सेवकांना भेटले. कोल्हापूर नाका, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक दत्त चौक, सैदापुर आदी ठिकठिकाणी मराठा सेवकांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी मराठा सेवकांनी स्थानिक पातळीवर कुणबी प्रमाणपत्र काढण्यासाठी साठी येणाऱ्या अडचणींचा पाढा त्यांच्यासमोर वाचला यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले आरक्षण हा आपला अधिकार आहे. कोणी जाणुनबुजून अडचणी निर्माण करत असेल तर ते खपवून घेणार नाही. अशा शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांच्या तक्रारी करा. त्यांच्यावर कारवाई करण्यास सरकारला आपण भाग पाडू असे त्यांनी सांगितले. यानंतर कराड तालुक्यातील शहापूर येथील शहीद जवान अर्जुन राजेंद्र जाधव यांच्या घरी जाऊन सांत्वनपर जाधव कुटुंबीयांची भेट घेतली. यानंतर ते सातारा- फलटण - बारामतीकडे रवाना झाले.

**स्व.यशवंतराव जगताप यांना श्रद्धांजली !!**

पाटणचे दिवंगत मराठा क्रांतीचे सेवक स्व. यशवंतराव जगताप (बाबा) यांचे यावेळी स्मरण करण्यात आले. मराठ्यांचा सच्चा मावळा हरपल्याची भावना मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केली. स्व.यशवंतराव जगताप (बाबा) यांची मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांना भेटण्याची तीव्र इच्छा होती. मात्र त्यांच्या आकस्मिक निधनाने ती अपूर्ण राहिली असल्याची भावना चिरंजीव शैलेश जगताप यांनी व्यक्त केली यावेळी पाटणचे मराठा सेवक उपस्थित होते.

# पावसाने डोळे वटारले; बळीराजा चिंतेत, दुबार पेरणीचे संकट

**अक्षराज : संतोष बांदूरकर**

**दि.१६, गोंडपिपरी (चंद्रपूर) :** मृग नक्षत्र लागून तब्बल ८ दिवस उलटले, तरीही समाधानकारक पावसाचा पत्ता नाही. त्यामुळे शेतकरी आशाळभूत नजरेने आभाळाकडे एकटक पाहत आहे.

पावसाच्या प्रतीक्षेत दिवसेंदिवस त्याची चिंता वाढत चालली असून, दुबार पेरणीचे संकट त्याच्या समोर आ वासून उभे ठाकले आहे. आधीच शेती करणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. शासनाकडून पिकांना हमीभाव मिळत नाही, खतांच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत, तर बी-बियाण्यांचाही खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या सर्व अडचणींमध्ये निसर्गाच्या लहरीपणाने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे. धान हे परिसरातील मुख्य पीक असले, तरी आर्थिक संकटातून बाहेर पडण्याच्या आशेने अनेक शेतकरी अलीकडच्या काळात कापूस लागवडीकडे वळले आहेत. मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न, कुटुंबाची जबाबदारी आणि भविष्यातील स्वप्ने उराशी बाळगून त्यांनी कर्ज काढून शेतीत गुंतवणूक केली. मात्र, वेळेवर पाऊस न आल्याने पेरलेले बी जमिनीतच वाळून गेले किंवा कुजून नष्ट झाले. परिणामी दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले असून शेतकरी हवालदिल झाला आहे.एका बाजूला मुलांच्या शाळा सुरू झाल्या आहेत. प्रवेश, शैक्षणिक साहित्य, कागदपत्रांची पूर्तता आणि इतर खर्च यांची चिंता सतावत आहे.

तर दुसऱ्या बाजूला शेतीसाठी पुन्हा भांडवल उभे करण्याचे मोठे आव्हान उभे आहे. दुबार पेरणीमुळे वर्षभराचे आर्थिक अंदाजपत्रक पूर्णपणे कोलमडून गेले आहे. यांत्रिकीकरणामुळे शेतीवरील खर्च वाढत असतानाच ग्रामीण भागात उभ्या राहिलेल्या कारखान्यांमुळे शेतमजूर मिळणेही कठीण झाले आहे. त्यातच लहान कुटुंब पद्धतीमुळे शेतीसाठी उपलब्ध मनुष्यबळ दिवसेंदिवस घटत आहे. परिणामी शेतीचा वाढता खर्च आणि घटते उत्पन्न यामुळे बळीराजा आर्थिक व मानसिक तणावाखाली सापडला



आहे.आज परिस्थिती अशी आहे की, शेतकऱ्याच्या नजरा फक्त आकाशाकडे लागल्या आहेत. त्याच्या ओठांवर एकच प्रार्थना आहे देवा, आता तरी पाऊस पडू दे.

लहानपणी आपण गुणगुणलेले
बालगीत आठवते...
**ये रे, ये रे पावसा,**
**तुला देतो पैसा,**
**पैसा झाला खोटा,**
**पाऊस आला मोठा.**

परंतु आजच्या बदलत्या हवामानाच्या काळात हे गीतही जणू कालबाह्य झाले आहे. कदाचित इंग्रजी कवितेतील Rain, Rain, Go Away हेच शब्द पावसाने मनावर घेतले असावेत आणि म्हणूनच तो आपल्या शेतकऱ्यांपासून दूर गेला असावा! मात्र, पाऊस कितीही उशिरा आला तरी शेतकऱ्याची आशा संपत नाही. कारण आभाळाकडे पाहत जगणाऱ्या या बळीराजाचा शेवटचा आधार आजही पावसाच आहे.

# पंढरपूरात किरकोळ वादातून रिक्षा चालकाचा निर्घृण खून, मृतदेह रेल्वे रुळावर टाकला

## पाय दरवाजावर लटकवून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न !

**अक्षराज : विकास सरवळे**
**दि.१६, पंढरपूर :**

किरकोळ वादातून एका रिक्षा चालकाचा निर्घृण खून करून मृतदेह रेल्वे रुळावर टाकल्याचा धक्कादायक प्रकार पंढरपूरमध्ये उघडकीस आला आहे. आरोपींनी खून केल्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेहाचा पाय दरवाजावर लटकवला होता. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पंढरपूर शहरातील रिक्षा चालक रोहित कोरे यांचा काही जणांशी किरकोळ कारणावरून वाद झाला होता. या वादाचे पर्यवसान खुनात झाले. सोमवारी रात्री ११.३० वाजता काही जण त्याला घरातून घेऊन गेले. घेऊन जाणारे देखील दारू पिलेले होते. तेव्हा रोहितने त्याच्या आईला भांडण होण्याची शक्यता व्यक्त केली होती. रोहित हा कधीही रेल्वे रुळावर जात नाही, असेही कुटुंबीयांचे म्हणणे आहे. आरोपींनी त्याचा निर्घृण खून करून मृतदेह रेल्वे रुळावरून आणून टाकला, जेणेकरून हा अपघात वाटावा. तसेच खुनाचा पुरावा नष्ट करण्यासाठी मृताचा पाय दरवाजाला लटकवण्यात आला होता.

घटनेची माहिती मिळताच पंढरपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. प्राथमिक तपासात हा घातपात असल्याचे निष्पन्न झाले आहे. किरकोळ वादातून हा खून झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणी पंढरपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे. शहरात घडलेल्या या निर्घृण हत्येमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या अमानुष घटनेमुळे पंढरपूर शहरात खळबळ उडाली असून पंढरपूर शहर पोलीस पुढील तपास करत आहेत.

दरम्यान, रेल्वे पोलिसांनी सुरुवातीला बेवारस मृतदेह म्हणून पंचनामा केला होता. परंतु, रोहित कोरे याच्या घरावर त्याचा पायाचा तुकडा आढळून आल्याने रेल्वे रुळावर आढळून आलेला मृतदेह रोहित याचा असल्याचे समोर आले. हत्या करून पुरावा नष्ट करण्यासाठी व अपघाताचा बनाव करण्यासाठी मृतदेह रुळावर टाकण्यात आला होता.




## खिशावरील आरोग्यभार

भारताची अर्थव्यवस्था जगातील वेगवान अर्थव्यवस्थांपैकी एक मानली जाते. देशाच्या आर्थिक प्रगतीत महाराष्ट्राचे योगदान सर्वाधिक आहे. मात्र, या आर्थिक स्थितीच्या पार्श्वभूमीवर, राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था इतकी आजारी का? हा प्रश्न पडतो. आर्थिक समृद्धी आणि आरोग्य क्षेत्रातील प्रगती यांचा थेट संबंध असतो, असा सर्वसाधारण समज आहे; परंतु नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या विविध अहवालांतून, भारतातील विविध राज्यांतील याचे चित्र स्पष्ट झाले आहे. आर्थिकदृष्ट्या आणि लोकसंख्येच्या दृष्टीने महाराष्ट्रापेक्षा लहान असलेली मणिपूर, मिझोराम, सिक्कीम, त्रिपुरा आणि केरळ ही राज्ये सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये पुढे असल्याचे दिसते.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार सार्वजनिक आरोग्यावरील खर्च जीडीपीच्या किमान ५ टक्के व राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ नुसार किमान २.५ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार मणिपूरने राज्याने सकल राज्य उत्पन्नाच्या (जीएसडीपी) सुमारे ५.५ टक्के, मिझोरामने ४.५ टक्के, त्रिपुराने आणि सिक्कीमने सुमारे ४ टक्के खर्च आरोग्यावर केला असल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या नॅशनल हेल्थ अकाऊंट्स (एनएचए) २०२२-२३ अहवालातून समोर येत आहे. तर आर्थिकदृष्ट्या प्रगत महाराष्ट्राचा आरोग्यावरील खर्च केवळ दीड ते दोन टक्क्यांच्या दरम्यान राहिला. सिक्कीम, मिझोराम, मणिपूर, त्रिपुरा आणि केरळ राज्याची लोकसंख्या कमी असली, तरी त्यांनी आरोग्याला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवले आहे. त्यामुळे या राज्यांच्या काही महत्त्वाच्या आरोग्य निर्देशांकांमध्ये महाराष्ट्रापेक्षा चांगली सुधारणा झाल्याचे दिसते.

आरोग्यसेवांची उपलब्धता, गुणवत्ता आणि सार्वजनिक गुंतवणूक यासाठी राज्य सरकारे थेट जबाबदार आहेत. अशा परिस्थितीत महाराष्ट्रासारख्या आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्यात सार्वजनिक आरोग्यावरील खर्च कमी कमी असणे, हे चिंताजनक आहे. हा केवळ आर्थिक प्रश्न नसून, तो विकासाच्या धोरणात्मक प्राधान्यक्रमांचा आरसा आहे.

महाराष्ट्रात आरोग्य क्षेत्रातील गुंतवणूक प्रामुख्याने वैद्यकीय महाविद्यालये, शहरी भागातील मोठी रुग्णालये आणि सार्वजनिक खासगी भागीदारी यावर होताना दिसते. प्राथमिक व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवांच्या बळकटीकरणाकडे काणाडोळा होतो. परिणामी, ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये आरोग्य सेवांची गुणवत्ता आणि उपलब्धतेची असमानता कायम राहिली आहे.

सार्वजनिक आरोग्यावरील कमी खर्चाचा पहिला परिणाम म्हणजे आरोग्यसेवांसाठी खासगी आरोग्य क्षेत्रावरील वाढते अवलंबित्व. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या अहवालानुसार, देशाच्या ग्रामीण भागातील सुमारे ५८ टक्के आणि शहरी भागातील ६५ टक्के नागरिक खासगी क्षेत्रातून आरोग्य सेवा घेतात. महाराष्ट्रात तर हे प्रमाण अधिक आहे. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील अपुऱ्या निदान सुविधा, रिक्त पदे, औषधांची अपुरी उपलब्धता यामुळे नागरिक खासगी सेवांकडे वळत आहेत. परिणामी, आरोग्य खर्चाचा भार थेट नागरिकांच्या खिशावर पडत असून या थेट खर्चाचे ('आऊट ऑफ पॉकेट एक्स्पेंडिचर') प्रमाण कमी होण्याऐवजी वाढतच चालले आहे. महाराष्ट्रात नागरिक सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये फक्त १८.६ टक्के सहभाग घेत असून, खासगी रुग्णालयांवरील अवलंबित्व अधिक (७७%) असल्यामुळे कुटुंबांवरील आर्थिक भार आणखी वाढत आहे. 'एनएसएस'च्या अहवालानुसार, महाराष्ट्रात सार्वजनिक रुग्णालयातून उपचाराचा सरासरी खर्च सुमारे सहा हजार ते आठ हजार रुपये येतो. तर खासगी रुग्णालयात हाच खर्च ४० हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत जातो. परिणामी महाराष्ट्रात अनेक कुटुंबांना गंभीर आजाराच्या उपचारासाठी कर्ज काढावे लागते, बचत खर्च करावी लागते किंवा मालमत्ता विकावी लागते. केवळ आरोग्यावरील खर्चामुळे दर वर्षी साडेपाच कोटी लोक दारिद्रेरेषेखाली जातात. **आरोग्यव्यवस्था सुधारण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रात संसाधनांची कमी नाही; पण आरोग्य क्षेत्राला दिलेले कमी प्राधान्य, जिल्हानिहाय विषमता आणि प्राथमिक आरोग्य व्यवस्थेतील गुंतवणुकीचा अभाव हे त्यातील पिछाडीचे कारण आहे. अर्थात, आरोग्यावर जास्त खर्च म्हणजे आपसूक चांगले आरोग्य, असे नाही! तर त्यासाठी सार्वजनिक निधीचा योग्य व प्रभावी वापर, नियोजन, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व हेही तितकेच महत्त्वाचे घटक आहेत. काही राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर खर्च होऊनही व्यवस्थापनातील त्रुटींमुळे अपेक्षित परिणाम साध्य झालेले नाहीत. त्यामुळे केवळ खर्च वाढविणे हा उपाय नसून, त्या खर्चाचा योग्य प्राधान्यक्रम ठरविणे आवश्यक आहे. उदा. केरळने अनेक दशकांपासून प्राथमिक आरोग्य केंद्रांची यंत्रणा मजबूत केली आहे. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग वाढविला आणि प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांना जास्त महत्त्व दिले आहे. परिणामी, सर्वच आरोग्य निर्देशकांमध्ये केरळने देशात सर्वोत्तम कामगिरी केल्याचे दिसते. तमिळनाडूमध्ये सार्वजनिक रुग्णालयांमध्ये औषधांची मोफत उपलब्धता, प्रयोगशाळा सुविधांची सक्षम यंत्रणा उभारली आहे. त्यामुळे नागरिकांचा सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास टिकून आहे.**

**- श्याम ठाणेदार**

# आतातरी जीवनावश्यक वस्तूंचे दर कमी होतील का ?



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल' या सामाजिक माध्यमाद्वारे अमेरिका आणि इराण यांच्यात १४ सूत्री शांतता करार झाल्याची घोषणा केली. त्यामुळे अमेरिका आणि इराण यांच्यात गेल्या १०७ दिवसांपासून चालू असलेले युद्ध संपणार असल्याचे अंततः स्पष्ट झाले.

१९ जूनला स्विझर्लंडमधील जिनिव्हा शहरात ट्रम्प यांच्या उपस्थितीत या शांतता करारावर स्वाक्षरी करण्यात येणार आहे. त्यानंतर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद यावर अंतिम मोहोर उमटवेल आणि त्यानंतर या युद्धाची अधिकृत समाप्ती होईल. युद्ध कोणालाही नको असते, युद्धामुळे अपरिमित जीवित आणि वित्त हानी तर होतेच शिवाय युद्धाचे दूरगामी परिणाम पुढे येणाऱ्या अनेक पिढ्यांना भोगावे लागतात.

मागील साडेतीन महिन्यांहून अधिक काळ सुरु असलेल्या युद्धात भारताचा प्रत्यक्ष सहभाग नसला तरी युद्धाचे पडसाद भारतातही मोठ्या प्रमाणात उमटले आहेत. महागाईने जनता होरपळली आहे. इंधनाच्या दरात आठ्वडा आठवड्याने वाढ होत गेली . घरगुती गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यावर कमालीचे निर्बंध आणण्यात आले ज्याचा सर्वात मोठा फटका हॉटेल व्यावसायिकांना बसला आहे. मे महिन्याच्या घाऊक महागाईचा दर ९.६ टक्क्यावर पोहोचला. मागील ४३ महिन्यांतील हा उच्चांक आहे. एप्रिलमध्ये हा दर ८.२६ इतका होता. महागाईने सामान्य जनतेचे अक्षरशः कंबरडे मोडले. इंधनाचे दर वाढल्यावर त्याचा परिणाम सर्वच वस्तूंच्या दरावर होतो.

अन्नधान्य, कपडे, जीवनावश्यक वस्तू, भाजीपाला यांसह प्रवासाचे दरही गेल्या ३ महिन्यांत गगनाला भिडले आहेत. सर्वसामान्य चाकरमान्यांच्या पोटाची खळगी भरणारा वडापाव १२ ते १५ रुपयांवरून थेट २५ ते ३० रुपयांवर पोहचला आहे. मोबाईलच्या किमतीत तर २० ते २५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. महागाईचा फटका शेअर बाजारासह प्रत्येक क्षेत्राला बसला आहे. ज्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित पूर्णतः कोलमडून गेले आहे. अशा परिस्थिती झालेली युद्धबंदी समस्त जगाला दिलासा देणारी आहे, त्यामुळे आतातरी इंधनासह जीवनावश्यक वस्तूंचे दर कमी होणार का ? दैनंदिन जीवन सुखकर होणार का ? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे. विरोधी पक्षाने त्यादृष्टीने आक्रमक पवित्रा घेतला असून. इंधनाचे दर कमी करण्यासाठी सरकारवर आता दबाव आणला जात आहे.

**- सौ, मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

# अमेरिका - इराण युद्ध बंदी करार व त्याचे जागतिक परिणाम

गेले सुमारे १०७ दिवस इराण अमेरिका व इस्त्रायल यांच्यात युद्ध सुरु होते. गेल्या रविवारी अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी या युद्धाला विराम देत असल्याबद्दल घोषणा केली. अर्थात जगाचा विश्वास ट्रम्प यांच्या घोषणेवर बसला नाही कारण आजपर्यंत अनेक घोषणा ट्रम्प यांनी केल्या होत्या व त्याप्रमाणे ते वागले नाहीत.

करारावर एकमत झाल्याचे वृत्त इराणने दिले आहे. मात्र इराणच्या अणुकराक्रमाच्या कळीच्या मुद्द्यावर अद्याप तोडगा निघालेला नाही. दोन्ही बाजूनी करार झाल्यानंतर ६० दिवसांच्या कालावधीत अणुकार्यक्रमावर चर्चा करण्यात येणार आहे. भारतासह अनेक देशांनी याचे स्वागत केले आहे. जगातील सर्वच देशातील इंधनाच्या किमती वाढल्या होत्या. भारतात सुद्धा इंधनाच्या किमती वाढल्या होत्या.

जगात जेवढ्या किमतींनी इंधनाच्या किमती वाढल्या तेवढया भारतात वाढल्या नाहीत. ही एक आशेची बाजू होती. भारताचे पंतप्रधान मोदी यांनी या कराराचे स्वागत केले असून पश्चिम आशियामध्ये आता शांतात नांदेल अशी अशा व्यक्त केली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सरचिटणिसांनी सुद्धा याचे स्वागत केले आहे आता होमरूझ मधून जहाजे विनासायास इंधनाची वाहतूक करू शकतील तसेच इराणच्या बंदरावरील अमेरिकेच्या नौदलाची नाकेबंदी हटविण्यात येईल असे अमेरिकेने जाहीर केले आहे. या युद्धबंदी करारामुळे आता जगात शांतता नांदेल. युद्धबंदीच्या घोषणेबरोबर इंधनाच्या किमती ५ टक्क्यांनी घसरल्या. या करारावर येत्या १९ तारखेस स्विझर्लंड मध्ये साह्य होणार आहेत. याचे संपूर्ण आयोजन पाकिस्तान करणार आहे.

या कराराचे चीनने सुद्धा स्वागत केले आहे. इस्त्रायल ने मात्र याला विरोध केला आहे. लेबेनान, सीरिया, आणि गाझा पट्टीतील ताब्यात घेतलेल्या भागातून आपले सैन्य माघारी घेणार नाही असे स्पष्ट केले आहे.आता हा संघर्ष अमेरिका इराण असा न राहता अमेरिका इस्त्रायल असा राहतो कि काय अशी शंका निर्माण झाली आहे. या युद्धात ८० वर्षाचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची भूमिका निर्णायक आहे. गेली सुमारे १०७ दिवस सतत युद्ध खेळले. त्यांना खुद्द अमेरिकेमधून प्रचंड विरोध होता. या शिवाय जागतिक लोकमत सुद्धा विरोधी बनत चालले होते.

त्यामुळे युद्ध बंदी ही ट्रम्प यांच्या साठी सुद्धा एक आशादायक घटना आहे. इस्त्रायलने मात्र आक्रमक पवित्र घेतला आहे यामुळे करारावर शंका व्यक्त आहे. करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर ६० दिवसांचा कालावधी युरेनियम काढून टाकण्याबाबतच्या तांत्रिक बाबी निश्चित करण्यासाठी वापरला जाईल असे दिसत आहे.



या कराराचे पडसाद भारतात सुद्धा उमटू लागलेत. इंधनाचे दार कमी करावेत यासाठी विरोधी पक्षांनी मागणी केली आहे. काही तज्ञाच्या मते इंधनाचे दर लगेच कमी होणार नाहीत भारत आपल्या गरजेपैकी सुमारे ८० टक्के तेल आयात करतो याचे व्यवहार डॉलर मध्ये चालतात त्यामुळे तेल स्वस्तझाले तरीही रुपया कमकुवत असल्यास त्याचा फायदा कमी होतो.

त्यातूनही तेल स्वस्त झाले तर त्याचा फायदा अत्यावश्यक वस्तू स्वस्त होतील. औधोगिक उत्पादनातील वस्तूंच्या किमती स्थिर राहतील मालवाहतुकीचे भाडे कमी होईल. एकूणच या कराराचे जागतिक परिणाम होणार आहेत. युद्धामुळे युद्ध करणाऱ्या देशांचा कोणताही फायदा होत नाही. या युद्धात अमेरिकेचे व इराणचे प्रचंड नुकसान झालेले आहे. त्याचा परिणाम जगावर सुद्धा झाला आहे.

**- शांताराम वाघ, पुणे.**
**मो.९६२३४५२५५३**

## स्वाती जोशी यांना ज्योतिष विद्या वाचस्पती पदवी प्रदान



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१६, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील रहिवासी स्वाती संजय जोशी यांना ज्योतिष शास्त्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल नुकतेच पुणे येथे अत्यंत प्रतिष्ठेची 'ज्योतिष विद्या वाचस्पती' पदवी, सन्मानचिन्ह आणि पुणेरी पगडी देऊन गौरवण्यात आले. त्यांच्या या बहुमानामुळे विंचूर शहरासह संपूर्ण परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जळगाव येथील 'डॉ. ज्योती जोशी इन्स्टिट्यूट'च्या वतीने पुणे येथे 'साधना सिद्धी गौरव महोत्सव' मोठ्या उत्साहात पार पडला. या दिमाखदार सोहळ्यात स्वाती जोशी यांना ज्योतिष शास्त्रातील त्यांच्या सखोल अभ्यासाची दखल घेत ही पदवी बहाल करण्यात आली. संस्थेच्या संचालिका डॉ. ज्योती जोशी, प्रसिद्ध सिने कलाकार सुनील पुरोहित आणि कोमल कुंभारे यांच्या शुभहस्ते जोशी यांना ही पदवी आणि मानचिन्ह प्रदान करून सन्मानित करण्यात आले. ज्योतिष क्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मानाची समजली जाणारी 'ज्योतिष विद्या वाचस्पती' ही पदवी मिळवण्यासाठी स्वाती जोशी यांनी ज्योतिष शास्त्राचा सतत आणि सखोल अभ्यास केला आहे. त्यांच्या या खडतर परिश्रमाला आणि ज्ञानाला या पुरस्काराच्या रूपाने मोठे यश लाभले आहे. त्यांच्या या यशाबद्दल विंचूर परिसरातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि व्यावसायिक अशा सर्वच स्तरांतून त्यांचे विशेष कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

# कोराडी विद्युत केंद्राचा प्लास्टिक मुक्तीचा संकल्प !

## ज्यूट बॅग वापरा, प्लास्टिक टाळा - सुदीप राणे

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** महानिर्मितीच्या कोराडी वीज केंद्रात प्लास्टिकमुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन कार्यालयीन तसेच वैयक्तिक जीवनात प्लास्टिकचा वापर कमीत कमी करण्याच्या हेतूने सर्व विभाग प्रमुखांना, कर्मचाऱ्यांना पर्यावरणपूरक ज्यूट बॅगचे वितरण प्रभारी मुख्य अभियंता सुदीप राणे यांचे हस्ते करण्यात आले.

या उपक्रमामागील व्यापक दृष्टीकोन म्हणजे अभियंते, अधिकारी, कर्मचारी व कंत्राटी कामगारांनी केवळ कार्यालयातच नव्हे तर घरगुती वापरात, बाजारपेठेत खरेदी करताना आणि दैनंदिन जीवनात प्लास्टिक पिशव्यांना पर्याय म्हणून ज्यूट बॅगचा अवलंब करावा. भविष्यात संपूर्ण वीज प्रकल्प, निवासी वसाहत आणि परिसर प्लास्टिकमुक्त करण्याची संकल्पना प्रभारी मुख्य अभियंता सुदीप राणे यांनी साकारली आहे. चौफेर कौतुकास्पद उपक्रम म्हणून याची चर्चा आहे. हे पर्यावरण संरक्षण करण्यासाठी उचललेले हे एक महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टीपूर्ण पाऊल असल्याचे दिसून येते.

ज्यूट बॅग पुनर्वापर करता येतात, टिकाऊ असतात, त्यामुळे लोक एकाच



प्लास्टिक पिशवी ऐवजी तीच ज्यूट बॅग वारंवार वापरतात. जसजसे ज्यूट बॅगचे वाटप वाढेल, तसतशी दुकानदारांकडून प्लास्टिक पिशव्यांची खरेदी कमी होईल. प्लास्टिक पिशव्यांपेक्षा ज्यूट बॅग नैसर्गिकरित्या विघटित होतात. त्यामुळे रस्ते, नाले व लँडफिलवरील ओझे कमी होते. बॅग वाटपामुळे लोकांना प्लास्टिकच्या हानीची जाणीव होते व ते प्लास्टिक नाकारण्यास प्रवृत्त होतात. कमी प्लास्टिक वापरामुळे नद्या, समुद्र, जमीन यांचे प्रदूषण कमी होते. प्लास्टिक जाळल्याने होणारे वायू प्रदूषणही टळते. अशा उपक्रमामुळे दीर्घ काळात प्लास्टिकच्या वापरात लक्षणीय घट होऊन, प्लास्टिक मुक्त जीवनशैली अंगवळणी पडण्यास मोलाची मदत होते, असे प्रभारी मुख्य अभियंता सुदीप राणे यांनी यावेळी म्हटले.

यावेळी उपमुख्य अभियंता शैलेन्द्र कासुलकर, श्री मूल, उपमुख्य महाव्यवस्थापक (वि.व.ले.) सीमा महाले, अधीक्षक अभियंते सचिन भगेवार, राजेश डाखोळे, सारिका सोनटक्के, किरण नानवटकर, मनोज उमप, प्रवीण बुटे, मानिनी वारजूरकर, प्रियंका देशमुख, अक्षय राणे यांच्यासह सर्व विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## शिक्षकांचे रिक्त पदे भरण्यासाठी वंचितची मागणी
## नागपूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात बहुतांश मुले जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत आहेत. त्यात गोरगरीब वर्गातील मुलांची संख्या सर्वाधिक आहे. मात्र या शाळांत शिक्षकांची संख्या अगदी कमी असून जिल्ह्यात शेकडो पदे रिक्त आहेत. शिक्षकांच्या या रिक्त संख्येमुळे मुलांचे शैक्षणिक भवितव्य अंधारात जाण्याचा मार्गावर आहे. जिल्ह्यातील शिक्षकांचे रिक्त पद भरण्याकरिता वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सहारे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा शिक्षणधिकारी निखिल भुयार यांना निवेदन सादर करून चर्चा करण्यात आली.

शिक्षकांच्या कमी संख्येमुळे खेड्यातील काही पालक मुलांना खाजगी शाळांमध्ये पाठवत असून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. जिल्हा परिषद टिकल्या तरच गरिबांना शिक्षण घेण्यात येईल. अन्यथा कॉन्व्हेंट संस्कृतीमध्ये गरिबांची मुले कुठे शिकतील अशा प्रश्न उपस्थित होत आहे. कमी होत जाणारी शिक्षकांची संख्या मुळे जिल्हा परिषदेच्या शिक्षणाच्या दर्जा खालावलेला आहे.

याकरिता वंचित बहुजन आघाडी मार्फत नागपूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत रिक्त असलेल्या शिक्षकांच्या जागा लवकरात लवकर भरण्यात याव्या. अन्यथा वंचित बहुजन आघाडी तर्फे तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. याप्रसंगी निवेदन देताना कार्यालयीन सचिव वैभव येवले, आय टी सेल प्रमुख शुभम वाहने प्रामुख्याने उपस्थित होते.

## देगलूरच्या उपजिल्हा रुग्णालयात
## शिवसेना ठाकरे पक्षाच्या वतीने गोंधळ आंदोलन



**अक्षराज : अब्दुल मुबिन**

**दि.१५, देगलूर (नांदेड) :** देगलूर उपजिल्हा रुग्णालयात नियुक्ती असलेल्या सर्व वैद्यकीय अधिकारी महीन्यातुन ५ दिवस हजर न राहता महीन्यातील सर्वच दिवस हजर राहून दररोज गोर-गरीब, दिन-दलित, शेतकरी, शेतमजूर यांना आरोग्य सेवा द्यावी व तसेच १०० खाटांचे रुग्णालय त्वरित कार्यान्वित व्हावे या मागणीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने दि.१५ जुन रोजी उपजिल्हा रुग्णालयाच्या आवारात गोंधळ आंदोलन शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.पेरके व वैद्यकीय अधिक्षक डॉ. देवणीकर यांच्या लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन समाप्त करण्यात आले. सर्व कार्यकर्ते या गोंधळ आंदोलनात मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. तसेच नागरिक सुद्धा मोठ्या प्रमाणात उपस्थितीत होते. यावेळी काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून देगलूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुर्य मोहन बोलमवाड यांच्या मार्गदर्शनाखाली इतर पोलिस उपनिरीक्षक आदींनी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आले होते. सर्व नागरिकांना आशा आहे की या आंदोलना मुळे खरोखरच आरोग्याच्या बाबतीत सर्व सुविधा योग्यवेळे वर नागरिकांना मिळेल.

## आण्णाहजारे, राधाकृष्ण विखे पाटील
## यांच्या वाढदिवसानिमित्ताने शालेय वह्यांचे वाटप



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१६, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुका म्हणजे डाव्या विचारनीचा तालुका, त्याच तालुक्यात लोकशाहीची बुलंद तोफ म्हणजे पदमभुषण आण्णासाहेब हजारे व महाराष्ट्राच्या राजकारणात स्व;ताचे आस्तित्व कायम टिकवुन ठेवणारे कुटुंब म्हणजे विखे घराणे - मधिल अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री, तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील या दोन महापुरूषांचा वाढ दिवसाचे औचित्य साधुन, पारनेर तालुक्याची बुलंद तोफ, तरुणांचे भाग्यविधाते म्हणजे पारनेर तालुका भाजपचे अध्यक्ष राहुल दादा शिंदे पाटील यांच्या विचार मंथनातुन या दोन महान पुरुषाचे वाढ दिवसा निमित्ताने पारनेर तालुक्यातील श्री शिवाजी विद्यालय रांजणगाव, कै. आण्णासाहेब शिंदे पाटील महाविद्यालय पाडळी रांजणगाव येथील शाळेतील सर्व विद्यार्थी-विध्यार्थिनी यांना तब्बल १० हजार शालेय वह्याचे मोफत वाटप करण्यात आले.

कार्यक्रमासाठी दोन्हीही विध्यालयातील प्राचार्य, सर्व शिक्षक वृंद गावचे सरपंच, उपसरपंच, सर्व संस्था, सर्व सेवा सोसायटीचे चेअरमन, व्हा.चेअरमन सर्व संचालक ग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थित होते.

## अधिक मासातील जावयाचा थाट : सासू-सासऱ्यांनी धरली व्यसनमुक्तीची वाट




**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१५, खंडाळा (सातारा) :** अधिक मासानिमित्ताने भारतीय संस्कृतीत नातेसंबंधातील नाजूक नाते जावई यांना आमंत्रित केले जाते. त्यांना पुरणपोळ्या धोंडपोळ्यासोबत काही भेटवस्तू, पोशाख, सुवर्णमुद्रा अथवा इतर वस्तू देण्याची प्रथा आहे.या गोष्टींना फाटा देत, व्यसनमुक्त जीवन सुखी जीवन हे तत्व अवलंबलेले जगन्नाथ शिंदे कोपर्डे सातारा यांनी सासू-सासरे संजय देशमुख तडवळे ता.कोरेगाव यांच्याकडे व्यसनमुक्तीचा आग्रह धरला. तंबाखू व मिश्रीचे व्यसन सोडाल तरच मी धोंडेपोळ्या जेवायला येईल,अन्यथा नाही असे सांगितले. माझे मागणे वैयक्तिक हितासाठी नसून तुमच्याच आरोग्यासाठी आहे असे समुपदेशन केले.जावयांचे मागणे सासू-सासर्यांनी मान्य केले आणि ते व्यसनमुक्त झाले.

या निमित्ताने समाजातून व्यसन हद्दपार करण्याचे कार्य राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती पुरस्कार प्राप्त व्यसनमुक्त युवक संघाचे वक्ते, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य जिल्हा संघटक जगन्नाथ शिंदे यांच्या माध्यमातून झाले आहे.

# चारठाणा येथील स्वस्त धान्य दुकानदारांवरील तक्रार ठरली खोटी

## चौकशीत काहीही आढळले नाही, दुकानदारांना नाहक मानसिक त्रास!

**अक्षराज : अलीम शेख**

**चारठाणा :** जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथील दोन स्वस्त धान्य दुकानदारांविरुद्ध करण्यात आलेली तक्रार पूर्णपणे तथ्यहीन आणि खोटी असल्याचे प्रशासकीय चौकशीत स्पष्ट झाले आहे.'स्वामी समर्थ महिला बचत गट' आणि 'इरशाद बेगम अब्दुल खालेक देशमुख' या दोन्ही दुकानदारांवर धान्य वाटप न करणे व इतर गंभीर आरोप करून तक्रार करण्यात आली होती. मात्र,या तक्रारीत कोणतेही तथ्य नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

या तक्रारीची दखल घेत महसूल आणि पुरवठा विभागाच्या पथकाने चारठाणा येथे जाऊन प्रत्यक्ष चौकशी केली.या चौकशी मोहिमेत नायब तहसीलदार डी. के. गायकवाड,तलाठी प्रवीण बुरकुल,पुरवठा लिपिक संदीप खापरे, महसूल सेवक महेश होळ,




कॉम्प्युटर ऑपरेटर सूरज बेंबळगे,सरपंच अनिरुद्ध चव्हाण आणि डॉक्टर राजेश पोखरणा यांच्या उपस्थितीत गावातील तब्बल ११६ लाभार्थ्यांची प्रत्यक्ष तपासणी व चौकशी करण्यात आली.या तपासणी दरम्यान तक्रारीत नमूद केलेल्या कोणत्याही आरोपांमध्ये तथ्य आढळले नाही.

धान्य वाटप नियमानुसार आणि वेळेवर होत असल्याचे या चौकशीत सिद्ध झाले आहे. एकीकडे या तपासणीत काहीही गैरप्रकार सापडलेला नाही,तर दुसरीकडे या खोट्या तक्रारीमुळे संबंधित दोन्ही रेशन दुकानदारांना विनाकारण मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले आहे.

केवळ राजकीय किंवा वैयक्तिक आकसापोटी प्रशासकीय यंत्रणेचा वापर करून निष्पाप व्यावसायिकांची बदनामी केल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे आता ज्यांनी ही खोटी तक्रार केली,त्या तक्रारदारांच्या विरोधातच कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी चारठाणा परिसरातून जोर धरत आहे.या प्रकारामुळे खोट्या तक्रारी करणाऱ्यांचे पितळ उघडे पडले असून, दुकानदारांना नाहक त्रास देणाऱ्यांवर कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# विंचूरमध्ये नवागत विद्यार्थ्यांची ट्रॅक्टरमधून शाही मिरवणूक

## 'शालेय प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात संपन्न

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१६, विंचूर (नाशिक) :** आज विंचूर येथील जिल्हा परिषद शाळेत शाळेचा पहिला दिवस निमित्ताने विविध उपक्रम व वाढदिवस मोठ्या थाटात संपन्न झाला.

**प्रभातफेरी आणि पहिले पाऊल :** कार्यक्रमाची सुरुवात विंचूर गावातून काढण्यात आलेल्या भव्य प्रभातफेरीने झाली. यामध्ये इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या चिमुकल्यांची ट्रॅक्टरमधून काढलेली आकर्षक मिरवणूक सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. शाळा आवारात आगमन झाल्यावर विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. यानंतर एक आगळावेगळा उपक्रम म्हणून नव्या विद्यार्थ्यांच्या पावलांचे कागदावर 'पहिले पाऊल' म्हणून ठसे घेण्यात आले व त्यांना गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

**शासकीय योजनांचे वाटप :** शासनाच्या धोरणात्मक परिपत्रकानुसार, प्रवेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मोफत दर्जेदार गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यामुळे मुलांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसून आला.

**वाढदिवसाचे औचित्य आणि सामाजिक बांधिलकी :** या सोहळ्याचे आणखी एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे विंचूरचे प्रतिष्ठित नागरिक विनोद शिरसाठ यांच्या उपस्थितीचे. त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिरसाठ दांपत्यातर्फे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना व लासलगाव येथे अनाथश्रमात शालेय साहित्याचे किट, चॉकलेट्स आणि बिस्किटांचे वाटप करण्यात आले. त्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे गावात



कौतुक होत आहे.

**उपस्थितांची मांदियाळी :** या सोहळ्याचे अध्यक्षस्थान विनोद शिरसाठ यांनी भूषवले. यावेळी विंचूर गावचे प्रथम नागरिक तथा सरपंच सचिन दादा दरेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील दरेकर, शिक्षणतज्ज्ञ ज्ञानेश्वर दरेकर, ज्ञानेश्वर पवार, किशोर जेऊघाले, राजुभाऊ मोरे, ओम राऊत, संजय पदाडे यांच्यासह पत्रकार सुनील क्षिरसागर प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच मोठ्या संख्येने पालक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

**शिक्षकांचे परिश्रम :** हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका ठाकरे मॅडम आणि सर्व शिक्षक वृंदाने विशेष परिश्रम घेतले. सुबक नियोजन आणि ग्रामस्थांच्या उदंड प्रतिसादामुळे यंदाचा शालेय प्रवेशोत्सव अधिकच संपन्न आणि संस्मरणीय ठरला.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर शाळेत प्रवेशोत्सव साजरा

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.१६, मुंबई :** सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच दि.१५ जून २०२६ रोजी मुंबई महानगर पालिकेच्या शाळा सुरू झाल्या. या शाळांमध्ये आज चिमुकल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प आणि चॉकलेट देऊन मान्यवरांच्या हस्ते स्वागत करून त्यांचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. जी /दक्षिण विभागातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर शालेय इमारतीमध्ये स्थानिक नगरसेवक विजय भणगे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा शाळा प्रवेशोत्सव सोहळा अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.



या प्रवेशोत्सव सोहळ्यासाठी इयत्ता पहिली ते दहावी पर्यंत च्या सर्व वर्गांसाठी मोफत प्रवेश देण्यात येत असून नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना मुंबई महानगर पालिकेच्या शिक्षण विभागाकडून मोफत पुरविण्यात येणाऱ्या २७ शालेयपयोगी वस्तू पैकी उपलब्ध झालेल्या शैक्षणिक साहित्याचे मान्यवरांच्या शुभहस्ते वाटप करण्यात आले. यावेळी स्थानिक नगरसेवक विजय भणगे यांच्या सोबत उबाठा शिवसेनेचे शाखा उपाध्यक्ष परमेश्वर चापा आणि एस व्ही क्लासेसचे संचालक भोगा सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना नगरसेवक विजय भणगे यांनी महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून भविष्यात आयएएस/आयपीएस अशा मोठमोठ्या हुद्द्यांवर पोहचावे आणि आपले व आपल्या पालकांचे तसेच आपल्या शाळेचे नाव रोशन करावे. अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना यथायोग्य मार्गदर्शन करून देशाची नवीन आदर्श पिढी निर्माण करावी, असा अशावाद व्यक्त केला.

यावेळी नगरसेवक विजय भणगे यांनी शालेय विद्यार्थ्यांसोबत सेल्फी पॉईंटवर सेल्फी काढले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इमारत प्रमुख सुजाता तडवी, माध्यमिक शाळेचे इन्चार्ज शिक्षक युसुफ खान, लो. प्राथ.च्या इन्चार्ज साक्षी रेडकर,एम पी एस च्या इन्चार्ज उषा परमार, चित्रकला शिक्षक आकाशानंद हिरवे, शारीरिक शिक्षण शिक्षिका रश्मी राणे, नयना पांचाळ, प्राजक्ता सुर्वे, निलम दळवी, सुजाता आठवले, सुरेश ऐवळे यांच्यासह डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंग्रजी शाळेचा संपूर्ण स्टाफ यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशेष शाळेच्या इन्चार्ज शिक्षिका कलिका विचारे यांनी केले. तर शारीरिक शिक्षण शिक्षक प्रभाकर हजारे यांनी आभारप्रदर्शन केले.

# खापरखेडा महावितरण तर्फे कृषी व घरगुती ग्राहकाची तक्रार नोंद कार्यशाळा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** पूर्वी हाताच्या घड्याळीला चाबी द्यावी लागत होती कालांतराने सेल किंवा बॅटरीवर चालणारी घडयाळ आली आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानामुळे आमूलाग्र बदल मनुष्य जिवनात झाले आहे. आता घडाळ विजेवर चार्ज होते. शिवाय वेळे सोबतच ब्लडप्रेशर, हृदयगती, ऑक्सिजन पातळी व फिटनेस मोजता येतो याशिवाय मोबाईल संवाद, संगीत आदींची सोय स्मार्ट घडयाळीमध्ये आहे अशाच प्रकारे डिजिटल तंत्रज्ञानातील बदल दूरचित्रवाणी, रेडीओ, संगणक, मोबाईल अश्या प्रकारच्या अनेक वस्तूत दिसून येत आहे मग ज्या महाराष्ट्र राज्यात ३ कोटी १६ लाख ग्राहकांना ऊन,वारा पाऊस याची काळजी न करता निरंतर अहोरात्र वीज पुरवठा करणाऱ्या महावितरण कंपनी ने डिजिटल का?होऊ नये म्हणून महावितरण ने २००५ मध्ये वीज ग्राहक व महावितरण यांच्यात पारदर्शीता कायम राहावी म्हणून फोटो मिटरचा प्रयोग यशस्वी केला आणि मोबाईल अँपची निर्मिती केली आणि ती यशस्वी झाली याच धर्तीवर डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून स्मार्ट टीओडी मिटरमुळे वीज दरातील सवलतीसह स्वयंचलित मिटर रिडींग, अचूक वीजबिल, दर तासाला रियल टाईम वीज वापराची माहीती एका क्लिकवर उपलब्ध आदी फायदे ग्राहकांना होईल अशी माहिति खापरखेडा महावितरणचे उपविभागीय कार्यालय येथे कृषी व घरगुती वीज ग्राहकांची तक्रार नोंद कार्यशाळेत कार्यक्रमाचे अध्यक्ष उपकार्यकारी अभियंता मंगेश कहोळे मार्गदर्शन करीत होते.

कार्यशाळेला प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार श्रीकांत जालंदर तर सोलर डिपारमेंट महाऊर्जाचे दिनेश ढेंगरे प्रमुख्याने उपस्थित होते. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना सौर कृषीपंप याबाबत माहीती दिली व घरगुती वीज ग्राहकांना स्मार्ट मिटर लावण्याचे आव्हान केले. शिवाय त्याचे फायदे सांगितले. सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत वीज वापरल्यास ८० पैसे ते १ रुपया वीज बिलातून सवलत मिळणार आहे. याबाबत माहिती दिली. यादरम्यान शेतकरी व घरगुती वीज ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण करून त्यांच्या शंका दूर केल्या.

कार्यक्रमाचे संचालन कनिष्ठ अभियंता सुजाता वानखेडे यांनी केले तर आभार स्नेहा निमजे हीने मानले. याप्रसंगी समीक्षा घोंघटकर, जयंत कोडगुले, उदय कापसे, राजकुमार छत्रे, अमोल बुनकर आदीसह शेतकरी व घरगुती वीज ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मांडओहोळ धरण परिसरातील निर्बंधांमुळे पिके धोक्यात

## राष्ट्रवादीचे नेते अमोल उगले यांचे प्रशासनाला निवेदन



कोणतीही पूर्वसूचना न देता मांडओहोळ धरण परिसरात लागू केलेल्या निर्बंधांमुळे शेतकऱ्यांच्या कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणुकीवर पाणी फिरण्याची भीती निर्माण झाली आहे. पिकांना पाणी न मिळाल्यास टोमॅटो, मिरचीची उभी पिके जळून खाक होतील. प्रशासनाने तातडीने पिकांचे पंचनामे करून विशेष अनुदान मंजूर करावे आणि या जाचक निर्बंधांचा पुनर्विचार करून बळीराजाला तातडीने दिलासा द्यावा, हीच आमची मागणी आहे.

**- अमोल उगले (नेते, टाकळी ढोकेश्वर जि.प.गट)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** मांडओहोळ धरण परिसरात अचानक लागू करण्यात आलेल्या पाणी वापराच्या निर्बंधांमुळे कर्जुले हर्या, मानेवाडी, सावरगाव, काळेवाडी, गोडसेवाडी, शिंदेवाडी, गुरवेवाडी आणि वासुंदे या गावांतील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

या निर्बंधांमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने विशेष आर्थिक अनुदान द्यावे आणि जाचक निर्बंधांबाबत पुनर्विचार करावा, अशी मागणी निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी व टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे नेते अमोल उगले यांनी पारनेरचे गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या परिसरात शेतकरी मोठ्या प्रमाणावर टोमॅटो, मिरची यांसारख्या नगदी पिकांची लागवड करतात. यासाठी शेतकऱ्यांनी खते, बियाणे, औषधे, ठिबक सिंचन आणि मशागतीवर लाखो रुपयांची गुंतवणूक केली आहे.

मात्र, प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता पाणी उपशावर निर्बंध घातल्यामुळे उभ्या पिकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. आधीच नैसर्गिक संकटे आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांचे या निर्णयामुळे कंबरडे मोडले आहे.

प्रशासनाला निवेदन देण्यात आले यावेळी भोंद्रे गावचे सरपंच अभिजीत झावरे, वारणवाडीचे सरपंच संजय काशीद, सामाजिक अशोक खैरे, निलेश पवार, युवराज खिलारी, सुरेश झावरे,डॉ. आकाश झावरे, अनिल तांबडे, पियुष कोकाटे, सचिन वाफारे, मयूर आंधळे, विवेक शिंदे, संपत फटांगरे यांच्यासह मांडओहळ परिसरातील शेतकरी, निलेश लंके प्रतिष्ठान व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संबंधित विभागाने तातडीने पिकांचे पंचनामे करून शासनाकडे मदतीचा प्रस्ताव पाठवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

# विद्यार्थ्यांची गुणवत्ता हीच विद्यालयाची खरी ओळख - सिताराम खिलारी

## ढोकेश्वर विद्यालयात नवोगत विद्यार्थ्यांचे स्वागत

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** शिक्षण हा विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा पाया असून या टप्प्यात मिळालेले शिक्षण आणि संस्कार विद्यार्थ्यांना आयुष्यभर उपयोगी पडतात. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड निर्माण करून त्यांची बौद्धिक क्षमता विकसित करावी. कोणत्याही शाळेची किंवा विद्यालयाची ओळख केवळ भव्य इमारती, आधुनिक सुविधा किंवा शिक्षकांच्या संख्येवरून होत नसते तर विद्यार्थ्यांची गुणवत्ता हीच त्या विद्यालयाची खरी ओळख असते असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी यांनी केले. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६ -२७ च्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे नवोगत विद्यार्थ्यांचे जेष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी यांनी गुलाबपुष्प, पुस्तके देऊन स्वागत केले. यावेळी त्यांनी शिक्षक व पालक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, यशस्वी आयुष्याचे धडे गिरवण्यासाठी ज्ञानार्जनाच्या प्रवासाला सुरुवात करणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेचा पहिला दिवस म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील संस्मरणीय क्षण असतो.



आजचा विद्यार्थी उद्याचा चांगला नागरिक झाला पाहिजे या दृष्टिकोनातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना घडवावे. श्री ढोकेश्वर विद्यालयाची विद्यार्थी संख्या टिकून आहे. ही अभिमानास्पद बाब असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी जिल्हा मराठा संस्था शैक्षणिक भौतिक सुविधा कमी पडू देणार नाही. अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. प्रवेशोत्सवानिमित्त इयत्ता पाचवीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच पद्मभूषण डॉ आण्णा हजारे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयाच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी चेअरमन नारायण झावरे, माजी चेअरमन बबनराव पायमोडे, दत्ता निवडुंगे, बापूसाहेब रांधवण, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लहू जाधव, उपाध्यक्ष शिवराज भालके,अशोक गांगड, कैलास नऱ्हे, अर्जुन ठाणगे,राजू पठाण, शेखर गायकवाड, सुनील पायमोडे, संभाजी मेहेर, सुनील ठुबे, अर्जुन रोकडे, सुभाष वाळुंज, वर्षा मेहेर,अरिफा शेख, सुवर्णा दुधावडे, मनिषा भोजने, कल्याणी नऱ्हे यांच्यासह पालक,विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# आ.मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे मोरवा विमानतळ विस्तार व आधुनिकीकरणाला गती

## आ. मुनगंटीवार यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद; मुख्यमंत्री यांचे त्वरित कार्यवाहीचे निर्देश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना आणखी एक महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे.

मोरवा विमानतळाच्या विस्तार व आधुनिकीकरणासाठी आ. मुनगंटीवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी संबंधित प्रस्तावाची तातडीने दखल घेत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर यांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या सकारात्मक निर्णयामुळे मोरवा विमानतळाच्या विस्तार व आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळणार असून, चंद्रपूरच्या औद्योगिक, पर्यटन आणि आर्थिक विकासाला नवे बळ प्राप्त होणार आहे.



मोरवा विमानतळाच्या विस्तार, आधुनिकीकरण तसेच धावपट्टीच्या वाढीव कामांना गती मिळावी यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची मुंबई येथे प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

चंद्रपूर जिल्ह्याच्या औद्योगिक, व्यावसायिक आणि पर्यटन विकासासाठी विमानतळाचा विस्तार अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. आ. मुनगंटीवार यांनी मांडलेल्या मोरवा विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठीच्या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी तातडीने पुढील कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

चंद्रपूर जिल्हा हा खनिज संपत्ती, ऊर्जा उत्पादन, सिमेंट उद्योग, पोलाद उद्योग आणि वनसंपदेच्या दृष्टीने राज्यातील महत्त्वाचा जिल्हा आहे. तसेच ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामुळे देश-विदेशातील पर्यटकांचे प्रमुख आकर्षण केंद्र म्हणून चंद्रपूरची ओळख निर्माण झाली आहे. मात्र, वाढत्या औद्योगिक आणि पर्यटनविषयक गरजांच्या तुलनेत येथील विमानतळाची सुविधा अपुरी असल्याने विकासाला मर्यादा येत असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या निदर्शनास आणून दिले होते.

सध्या चंद्रपूर विमानतळाची धावपट्टी सुमारे ९०० मीटर लांबीची असून छोट्या प्रवासी विमानांच्या उड्डाणासाठी ती अपुरी आहे. भविष्यात नियमित हवाई सेवा सुरू करण्यासाठी धावपट्टीचा विस्तार, डीजीसीए मानकांनुसार सुविधा उभारणे आणि अन्य पायाभूत विकासकामे करणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना पुढील कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

# थोडक्यात

## शाळा सुरू....बाजारपेठा गजबजल्या

### वह्या, पुस्तके आणि शालेय साहित्याच्या किमतींमध्ये १० ते १५ टक्क्यांनी वाढ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, अहिल्यानगर :** नगर शहर व तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये दि.१५ जून २०२६ पासून सुरू झाले आहेत. शालेय साहित्य खरेदीसाठी नगर शहरासह जिल्ह्यात बाजारपेठेत मोठी गर्दी होत आहे. नवीन शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी विद्यार्थी आणि पालक वह्या, पुस्तके, शालेय गणवेश, बूट, दप्तर, पाणी बॉटल तसेच अन्य आवश्यक साहित्य खरेदी करण्यात व्यस्त आहेत.

शालेय साहित्य विक्री करणारी दुकाने सध्या ग्राहकांनी गजबजून गेली आहेत. सकाळपासून रात्रीपर्यंत खरेदीदारांची लगबग सुरू आहे. मात्र, यंदा शालेय साहित्याच्या किमतींमध्ये झालेल्या वाढीमुळे पालकांच्या चिंतेत भर पडली आहे. आधीच वाढत्या महागाईचा सामना करणाऱ्या कुटुंबांना मुलांच्या शिक्षणासाठी अधिक खर्च करावा लागत असल्याने आर्थिक ताण जाणवत आहे. कागद, प्लास्टिक, शाई तसेच वाहतूक खर्चात झालेल्या वाढीचा परिणाम शालेय साहित्याच्या दरांवर झाला आहे.

यामुळे वह्या आणि पुस्तकांच्या किमतींमध्ये सरासरी १० ते १५ टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. तसेच पेन, कंपास बॉक्स, पाण्याच्या बाटल्या, टिफीन बॉक्स आणि दप्तरांच्या दरातही वाढ झाली आहे. यावर्षी काही वर्गाच्या अभ्यासक्रमात बदल करण्यात आल्याने विद्यार्थ्यांना नवीन पुस्तके व संच खरेदी करणे वाढला आहे. त्यामुळे पालकांचा खर्च आणखी वाढला आहे. शिक्षणाचा वाढता खर्च अनेक कुटुंबांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. नवीन शैक्षणिक वर्षाच्या तयारीत विद्यार्थी उत्साहात असले तरी वाढत्या किमतीमुळे पालकांच्या खिशाला मात्र चांगलीच झळ बसत आहे.

## सारणीच्या सुपुत्राची वैद्यकीय क्षेत्रात भरारी; डॉ.कोंब यांना एमबीबीएस पदवी



### ग्रामस्थांकडून सत्कार

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१६, डहाणू (पालघर) :** पालघर जिल्ह्यामधील डहाणू तालुक्यातील सारणी गावातील आदिवासी समाजातील होतकरू युवक ऋतिक लहू कोंब यांनी एमबीबीएस पदवी संपादन करून डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे सारणी गावासह संपूर्ण आदिवासी समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतलेल्या क्रतिक यांच्या यशामागे आई-वडिलांचे कष्ट, त्याग आणि जिद्द महत्त्वाची ठरली. दोघेही सुशिक्षित नसतानाही त्यांनी मोलमजुरी करून मुलाला उच्च शिक्षण दिले. त्यांच्या अथक परिश्रमांमुळेच क्रतिक यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून डॉक्टर होण्याचा मान मिळविला आहे. आदिवासी समाजातील पहिले वैद्यकीय पदवीधर म्हणून ऋतिक यांची ओळख निर्माण झाली आहे. समाजातील ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. मधुकर डगला यांनी अनेक वर्षांपूर्वी पेटविलेल्या शिक्षणाच्या प्रेरणेच्या दीपातूनच हे यश शक्य झाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. त्यांच्या प्रेरणेतून आज सारणी गावाला डॉक्टर मिळाल्याने गावकऱ्यांमध्ये विशेष अभिमान व्यक्त होत आहे. ऋतिक यांनी आपल्या मेहनत, चिकाटी आणि जिद्दीच्या बळावर हे यश मिळविले असून त्यांनी केवळ आपल्या कुटुंबाचेच नव्हे, तर संपूर्ण आदिवासी समाजाचे नाव उंचावले आहे. त्यांच्या यशामुळे गावातील आणि समाजातील अनेक युवक-युवतींना उच्च शिक्षण घेण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

यशाबद्दल आयोजित सत्कार समारंभाला प्रा.सुधीर भोईर , ॲड.नितेश पाचलकर, नितेश कोंब, महेश गुहे, प्रमोद भोईर, सीताराम कोंब, सुरेश कोंब यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ.ऋतिक कोंब यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना मान्यवरांनी शिक्षण हेच समाज प्रगतीचे प्रभावी साधन असल्याचे सांगत, डॉ. ऋतिक कोंब यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून युवकांनी उच्च शिक्षणाकडे वाटचाल करावी, असे आवाहन केले. समाजसेवेच्या माध्यमातून जनतेची सेवा करत आपल्या कार्याचा ठसा उमटवावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या ट्रायकोडर्मा निर्मिती कंटेनरला डिझाईनसंबंधीचे पेटंट प्राप्त

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१६, राहुरी (अहिल्यानगर) :** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे व संशोधन संचालक डॉ.प्रशांत बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि संशोधन केंद्र, कुंदेवाडी, ता.निफाड, जि.नाशिक येथील वनस्पती रोगशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक (रोगशास्त्रज्ञ) डॉ.पोपट खंडागळे यांनी स्ट्रॉबेरीच्या प्लेटप्रमाणे जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा तयार करण्यासाठी रचना प्रारूप तयार केले आहे. त्यास भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाने मान्यता दिली आहे. व्यापारी तत्त्वावर ट्रायकोडर्मा तयार करण्यासाठी काचेच्या बाटल्या प्रत्येक वेळेस निर्जंतुक कराव्या लागतात. परंतु या कंटेनरमध्ये त्याची गरज नाही. प्लेट फक्त बाह्य निर्जंतुकीकरणावर देखील बुरशीची योग्य वाढ होते. यासाठी वारंवार निर्जंतुकीकरणाची गरज नसल्याने वीज बिलाची तसेच मानवी श्रमाची बचत होते. हे कंटेनर स्वस्त, रिसायकलेबल, प्रदूषण विरहित व उपलब्ध सोपे आहे. हे कंटेनर तयार करण्यासाठी वनस्पती रोगशास्त्र व अनुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ.आर.टी. गायकवाड, गहू विशेषज्ञ डॉ.बी.एम.म्हस्के, डॉ.एस.बी. गावडे, डॉ.एन. एम.मगर, डी.बी.पाटील, डॉ.पी.बी.खैरे व डॉ.एच.आर.कुमावत यांचे सहकार्य लाभले.